**PRESS MONITOR**

Publication : Lokshahi Warta
Edition : Kolhapur
Date : March 01, 2017

# एचएसआयएलतर्फे हिंडवेअर स्नोक्रेस्ट एअर कुलर्स बाजारात

**लोकशाही वार्ता/नागपूर**

हिंडवेअर या भारतातील सॅनिटरीवेअर बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रॅण्डचे प्रमोटर एचएसआयएल लिमिटेडतर्फे एअर कुलर्समधील नव्या उत्पादनांचे अनावरण करण्यात आले. हिंडवेअर स्नोक्रेस्ट या ब्रॅण्डमधील या उत्पादनात एअर कुलर्समधील समोरच्या पॅनलचा रंग बदलता येतो.

एअर कुलर्समधील या नव्या उत्पादनांमुळे एचएसआयएलच्या अष्टपैलू आणि व्यापक कन्झ्युमर प्रोडक्टस डिव्हिजनला अधिक बळकटी मिळेल. भारतातील ३ हजार ६५० कोटींच्या एअर कुलर्सच्या बाजारपेठेत १६ टक्के सीएजीआर अनुभवला आहे. या बाजारपेठेत संघटित बाजारपेठेचा हिस्सा केवळ एक तृतियांश आहे. डेझर्ट, पर्सनल आणि विंडो या विभागातील हे एअर कुलर्स १८ लि. ते १०० लि. अशा एकूण १४ प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. रंग बदलता येणाऱ्या पॅनलची सुविधा काही निवडक मॉडेलमध्ये आहे. अप्रतिम डिझाईन्स कल्पकता आणि अजोड दर्जा हे एचएसआयएलच्या व्यवसाय नीतिमत्तेचे मूळ आहे. कन्झ्युमर बिझिनेसमध्ये वाढ करणे आणि या विभागात आघाडीच्या स्थानी पोहोचावे, या उद्देशासह आम्ही आमच्या ग्राहकांना उत्कृष्ट उत्पादने यापुढेही देत राहू, असे एचएसआयएल लि.चे व्हीसीएमडी संदीप सोमानी यांनी सांगितले.